# प्रेस नोट

## सिंहगड पोलीसांकडुन सराईत गुन्हेगार जेरबंद, ०१ देशी कटटा व ०२ जिवंत काडतुसे हस्तगत

---

सदर बाबत अधिक माहिती अशी की, लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभुमीवर सिंहगड रोड तपास पथकातील अधिकारी/कर्मचारी हे गस्तीवर असतांना पोकॉ/ दत्ता सोनवणे व पोकॉ/दयानंद तेलंगे पाटील यांना त्यांचे बातमीदारामार्फत बातमी मिळाली की रिलॅक्स हॉटेल शेजारी, नांदेड फाटयाजवळ, सिंहगड रोड पुणे या ठिकाणी सिंहगड रोड पो स्टे रेकॉर्डवरील गुन्हेगार हा अवैध अग्नीशस्त्र (देशी कटटा) कमरेस लावुन फिरत आहे. सदर ची बातमी प्राप्त होताच तपास पथकातील अधिकारी/कर्मचारी यांनी नमुद ठिकाणी ट्रॅप लावुन इसम नामे १) समीर राजाराम गवस वय २९ रा. रूम नं. ८,वाबळे चाळ, पाण्याचे टाकीशेजारी, वडगाव बुा पुणे २) पवन कृष्णा कांबळे वय २४ रा.पावणजाई मंदिरासमोर, घुलेनगर, वडगाव बुा पुणे यांना ताब्यात घेवुन अ क्र १ याच्या ताब्यातुन ०१ देशी बनावटीचा कटटा व अ क्र २ याच्या ताब्यातुन ०२ जिवंत काडतुसे हस्तगत केली. नमुद दोन्ही आरोपी यांचकडे अधिक तपास करता त्यांना सदरचे अग्नीशस्त्र इसम नामे रमेश बाल गोविन्द, वय २५, रा १०, रा रदयापुरवा गडीघाट, चित्रकुट, राज्य बिहार सध्या रा सर्व्हे न २५, नारायणी इंडस्ट्री, खाडे औदयोगिक चाळ, नांदेड फाटा ता हवेली जि पुणे याने विकल्याची माहिती दिल्यावरुन रमेश गोविन्द यास देखील ताब्यात घेवुन अटक करण्यात आलेली आहे. सदर बाबत सिंहगड रोड पो स्टे गुरन २१३/१९ आर्म ॲक्ट कलम ३,७ (२५) नुसार गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. यातील आरोपी नामे समीर राजाराम गवस वय २९ रा. रूम नं. ८,वाबळे चाळ, पाण्याचे टाकीशेजारी, वडगाव बुा पुणे हा मंगेश कदम टोळीतील सदस्य असुन त्याचेवर यापुर्वी खुनाच्या प्रयत्नाचा गुन्हा दाखल आहे. नमुद आरोपींनी सदरचे अग्नीशस्त्र जवळ बाळगण्याचे कारण काय याबाबत अधिक तपास पोउपनि गिरीष सोनवणे करीत आहे.

सदरची कामगिरी ही पोलीस उपआयुक्त परीमंडळ -३ श्री मंगेश शिंदे, सहा पोलीस आयुक्त, सिंहगड रोड विभाग, श्री बाजीराव मोहीते, वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री दुर्योधन पवार, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री क्रांतीकुमार पाटील यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक गिरीष सोनवणे, पोलीस कर्मचारी दयानंद तेलंगे पाटील, दत्ता सोनवणे, राहुल शेडगे, संतोष सावंत, यशवंत ओंबासे, श्रीकांत दगडे, पुरुषोत्तम गुन्ला, सचिन माळवे, अविनाश कोंडे, वामन जाधव, रफीक नदाफ, किशोर शिंदे यांचे पथकाने केली.